**MHKO050031742023**

**<u>सं.फौ.खटला क्रं. १६६५/२०२३.</u>**
सी. एन. आर. क्र. MHKO050031742023
**<u>निशाणी क्रं. /क</u>**

**<u>न्या य नि र्ण य</u>**
(घोषीत दिनांक २०.०५.२०२४)

०१. खालील मुद्दे माझे निदर्शनास आले व त्या मुद्यांना निष्कर्ष कारणमीमांसे सहित खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दि. ११/०५/२०२३ रोजी १०.०० ते ११.०० वा. चे सुमारास कोरोची गावचे हद्दीत मोकळया जागेत येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपी बेकायदा विक्रीच्या उद्देशाने गावठी मद्य व इतर मुद्देमाल बेकायदेशीरित्या जवळ बाळगुन आल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| २) | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

**<u>का र ण मी मां सा</u>**

**<u>मुद्दे क्रमांक १ व २ बाबतः</u>–**

०२. सदर प्रकरणी आरोपी विरुध्द गुन्ह्याच्या सिध्दतेकरिता अभियोग पक्षातर्फे पंच साक्षिदार सागर निवास कांबळे (अ.सा.क्र.१– नि.क्र.७) यास तपासण्यात आले.

०३. पंच सागर कांबळे (अ.सा.क्र.१–नि.क्र.७) याने आपल्या पुराव्यादरम्यान त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नसल्याचे कथन करुन पंचनाम्यातील मजकूर नाकारला आहे. जरी त्याने पंचनाम्यावरील स्वतःची सही ओळखली असली तरी त्याने पंचनाम्यातील मजकूर नाकारला आहे. सदर साक्षिदाराने अभियोग पक्षास सहाय्य न केल्यामुळे त्याचा पुरावा आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत करण्याइतपत सक्षम नाही. त्यामुळे सदरचा पंचनामा पुर्णांशाने शाबीत करण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणी अभियोग पक्षातर्फे स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षिदार तपासण्यात आले नाहीत. याकामी रासायनिक विश्लेषण अहवाल नाही. त्यामुळे अभियोग पक्ष म्हणतो अशी दारुच आरोपीच्या कब्जात सापडली असे ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे आरोपीच्या कब्जातून दारु जप्त केली याबाबत शंकेस वाव मिळतो. प्रस्तुत प्रकरणी जप्ती पंचनामा शाबीत करण्याकरता अभियोग पक्षातर्फे दुस–या पंच साक्षिदाराचा पुरावा नोंदविण्यात आलेला नाही. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष आलेला नाही. आरोपी विरुध्द त्यास गुन्ह्यात गोवणारा कोणताही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अथवा परिस्थितीजन्य पुरावा न्यायालयात सादर झाला नाही. प्रस्तुत प्रकरणी अभियोग पक्षातर्फे जो काही पुरावा सादर करण्यात आला त्यावरून आरोपीवरील गुन्हा पुर्णांशाने शाबीत करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. याकामी जप्त असलेला मुद्देमाल नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे योग्य होईल. म्हणून **मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी** व मुद्दा क्र.२ चे उत्तर त्याप्रमाणे देऊन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी मारुती सिदु धनगर यांची महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) या गुन्ह्यांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व वैयक्तीक जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रु.५,०००/– चे जामीन बंधपत्र सादर करावेत. सदर जामीन बंधपत्र सहा महिन्यापर्यंत अस्तित्वात राहतील.

४. जप्त मुद्देमाल एका कागदी पुठयाच्या बॉक्समधील अंदाजे रक्कम रु. २१००/– च्या देशी दारु संत्राच्या १८० मिलीच्या ३० सिलबंद बादल्या चार काचेचे ग्लास हे अपिल कालावधीनंतर कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे पाठवून देण्यात यावेत.

Digitally signed by SHASHANK SURESH PEDNEKAR
Date: 2024.05.22 11:46:04 +0530

इचलकरंजी.
दिनांकः २०/०५/२०२४.

(**एस. एस. पेडणेकर**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं.५,
इचलकरंजी.